<u>विशेष दिवाणी दावा क्र. १४५/२०१८ मधील नि.क्र. ३४ खाली आदेश</u>

<u>(प्रदिप उर्फ सचिन तुकाराम कदम वि. अभिजीत चव्हाण)</u>

<u>(CNR No. MHSN020012592018)</u>

१. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले.

२. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की मुळ दावा हा नुकसान भरपाईसाठी व अब्रुनुकसानीची रक्कम मिळण्याकरीता दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर असल्याकारणाने दिनांक ०८/०८/२०२४ रोजी त्यांच्याविरुध्द निशाणी क्रमांक २१ कडे उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला होता. त्यामुळे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

३. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांना पुरेशी संधी देऊन देखील वादीचा उलटतपास घेतलेला नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द 'उलटतपास नाही' असा आदेश पारीत करण्यात आला. परंतु, दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता, तसेच प्रकरणात वादी व प्रतिवादी दोघांचे हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे प्रतिवादींना उलटतपास घेण्याची संधी देवून प्रकरण गुणदोषावर चालविणे न्यायोचीत होईल, जेणेकरुन वादी व प्रतिवादींमधील सर्व वादप्रश्न कायदेशीर गुंतागुंत न वाढविता प्रकरण निकाली काढण्यास न्यायालयास मदत होईल. प्रस्तुत प्रतिवादी यांनी निश्चितच पुरेशी संधी मिळुनही वादी यांचा उलटपास घेतलेला नाही. केवळ या कारणावरुन अर्ज नामंजुर करणे न्यायोचित होणार नाही. परंतु, प्रतिवादी यांचेवर खर्च बसवून प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

:: <u>आदेश</u> ::

१. अर्ज नि. ३४ मंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च म्हणून प्रतिवादी यांनी वादींना रक्कम रु. १०००/- द्यावेत.

VIBHA PRAKASH GAIKWAD

Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2025.02.28 11:15:00 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड)

दि. २७/०२/२०२५ २रे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.